December 2010

December 31

"कामूच्या ' आऊटसायडर ' मधला नायक त्याच्या आईच्या प्रेतापुढे बसून कॉफी पितो, सिगरेट ओढतो. यावरच्या ' स्ट्रेंजर ' या चित्रपटातही हे दृश्य आहे."

December 28

"वस्तू, माणसे, निसर्ग इत्यादींशी असणारे संबंध समजत राहण्याच्या प्रक्रियेत जगणे म्हणजेच चिंतनशीलता, म्हणजेच संस्कृती. याच्या अभावात विकृती, ताण, दुःख. इथे आर्थिक फायद्याचा प्रश्न नसून जगण्यातल्या तोट्याचा प्रश्न आहे. हा तोटा सगळा आर्थिक फायदा मातीमोल करू शकतो. करतोच आहे. या अर्थाने आर्थिक फायद्याशीही याचा संबंध आहे. हे लक्षात घेऊन आता मी चिंतनशील होतो, असे म्हणून कुणी चिंतनशील होऊ शकत नाही, ही यातली गोम आहे."

"लेखनाचे कौशल्य आत्मसात केलेले व्यक्तिमत्व ते कौशल्य वापरायच्या, दाखवायच्या संधी शोधत असते. चिंतनाच्या बाबतीत चिंतनशीलता असते पण ' चिंतनशील व्यक्तिमत्व ' नसते कारण चिंतनशीलता ही प्रवाही असते. त्यामुळे वापरणे, दाखवणे, वाहवा मिळवणे यांचा इथे संबंधच नसतो. उथळ लेखक जसे सुचायच्या प्रतीक्षेत असतात तसे चिंतनशीलतेत नसते.

ज्ञानेश्वरांना ' अमृतानुभव ' सुचला किंवा काफ्काला ' ट्रायल ' सुचली, असे म्हणतानाच खटकते ते का, हे पाहावे. चिंतनशीलता ही अनेक प्रकारे व्यक्त होत असते आणि सांस्कृतिक दृष्ट्या ते महत्त्वाचे आहे, हे गिरीशचे म्हणणे कुणालाही मान्य व्हावे असेच आहे."

December 27

"अनुराग कश्यप यांच्या मुलाखतीत उल्लेखलेले त्यांचे चित्रपट मी पाहिलेले
नाहीत. आता अर्थात पाहीनच.
अप्रतिम मुलाखत, यात वादच नाही. पण अनेक ठिकाणी जाणवणारा अपुरेपणा इथेही आहेच.
वेगळे म्हणजे काय, कशासाठी -- अशा अंगाने त्यांच्या जगण्याच्या आकलनात
खोल बुडी मारायचा प्रयत्न झाला पाहिजे. या बाबतीत आपले मुलाखतकार कमी पडतात. इथेही तेच झाले आहे.
पण, ही मुलाखत पाठवल्याबद्दल धन्यवाद !"

December 26

"तुमच्या या कामाबद्दल समजल्याने आनंद वाटला. अशा चित्रपटांना सगळीकडेच लोकाश्रय कमी असेल तर इतर देशांत याची आर्थिक गणिते कशी जुळवतात ? खरोखरच, सवडीने सांगा. तारकोवस्कीही म्हणतो की चांगले चित्रपट ' गर्दी ' पाहात नाही."

Prachi Dublay

"Thought also is a material movement. It is limited. All that is limited is virtual and we cannot ' think ' of the real !"

"Whatever we call real has to be virtual because it has to be a particular conditioned response."

"If thinking is limited and ' being ' is unlimited there is no possibility of thinking grasping ' being '."

"Perhaps it was Dr. Radhakrishnan who had said, " You cannot control events but you can control your reactions to them. ""

"May be, there is no fragmentation in space."

Ravee Lakhe

"' प्रतिगामी विकास ' म्हणजे उच्च मध्यमवर्गीयांनी आता व्यक्तिगत विकास ' पुरे ' म्हणणं. त्याच मुलाखतीत सारामागोंनी ' चांगुलपणाची क्रांती ' ही एक स्वप्नवत वाटावी अशी कल्पनाही मांडलेली आहे. आणखी एक महत्त्वाचे म्हणजे हे जग आज जसे आहे त्याला ' नाही ' म्हणण्याचे महत्त्व ते सांगतात. एका ठिकाणी ते म्हणतात, " मी केवळ एक कादंबरीकार आहे. हे जग मला जसं दिसतं ते लिहून मी मोकळा होतो. माझं काम जगात परिवर्तन करणं हे नाही. " प्रणवने दिलेल्या लिंकमध्येही एक महत्त्वाचे वाक्य आहे ः -- " We can't accept truth coming from other people. We must always be able to question those truths. "